# स्त्रीसूक्त

अश्विनी धोंगडे

REFBK-0025598
REFBK-0025598

संदर्भ काव्य
२५७३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

15 JUN 1988
11 JUN 1989
19 MAR 1997
26 MAR 1997

(क्र. मा. पद्दा)
५०००–११–८६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५५९८

# स्त्रीसूक्त

( कवितासंग्रह )

अश्विनी धोंगडे

REFBK-0025598
REFBK-0025598

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© अश्विनी धोंगडे

प्रकाशन काल
प्रथमावृत्ती १७ फेब्रुवारी १९८८

मुखपृष्ठ
सुभाष अवचट

मूल्य : सत्तावीस रुपये पन्नास पैसे फक्त

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
शिव-पार्वती, टिळक रोड
पुणे ३०

मी आहे ब्रह्मांडाची अधीश्वरी
जीवांना कर्माचे फळ भोगविणारी
जीवांना ऐश्वर्य वहाल करणारी
मी चेतन आहे. सर्वज्ञ आहे.
एक असूनही नानारूपात नटले आहे.
मी सर्वतंत्रस्वतंत्र आहे.
माझ्यावर कोणाचेही प्रभुत्व नाही
हे अखिल विश्वही माझीच विभूती आहे.

— वागांभृणी ( ऋग्वेद् )

# अनुक्रम


| | |
|---|---|
| फिर्याद | १ |
| विमुक्ता | २ |
| गेट सेट | ३ |
| स्त्री | ४ |
| लोकलमधे | ५ |
| दिन-विशेष | ६ |
| बलात्कार | ७ |
| बातम्या | ८ |
| यादी | १० |
| स्त्रीजन्म | ११ |
| स्त्रीमुक्ती | १२ |
| तू कोण ? | १४ |
| ती एक मिनी कॉम्प्युटर | १५ |
| कॅक्टस् | १७ |
| रूपकंवर | १८ |
| विटंबना | १९ |
| शंभर वर्षे | २० |
| संध्याकाळ | २१ |

| | |
|---|---|
| बायको | २३ |
| प्रसिद्धी | २४ |
| गतीची सर्कस | २६ |
| बिनचेहऱ्याची | २८ |
| दोन मुलांची आई | २९ |
| गृहिणी | ३१ |
| छोट्या जाहिराती | ३२ |
| बॉन्साय | ३३ |
| त्यानंतर | ३४ |
| सुट्टीचा दिवस | ३५ |
| फ्लॅटमधे | ३६ |
| धुंदी | ३८ |
| तळ्यात मळ्यात | ३९ |
| नको बाई | ४० |
| अवलंबिता | ४१ |
| आक्रस | ४३ |
| प्रतिबिंब | ४४ |
| आधार | ४५ |
| स्वस्त | ४७ |
| वाटणी | ४८ |

| | |
|---|---|
| काल आणि आज | ५० |
| गद्यमय | ५१ |
| शेम ऑन हर | ५२ |
| बायकी | ५३ |
| दिल्या घरी तू | ५४ |
| देणे | ५६ |
| सुखी संसार | ५८ |
| यंत्र | ५९ |
| वाढत्या वयात | ६० |
| सुशिक्षिता | ६१ |
| स्टॅन्डर्ड | ६२ |
| चार क्षण | ६३ |
| विक्री वस्तू | ६४ |
| अशी ती | ६५ |
| एकदा तरी | ६६ |
| गरजा | ६७ |
| वहिवाट | ६९ |
| ओळख | ७१ |
| स्वतःसाठी | ७२ |
| निर्लेप | ७३ |

०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६३
२५५१९
२७४५६
शाखा (स्थळ

## फिर्याद

त्या कवितेवर तिची फिर्याद आहे
जिने प्रेमाच्या भाकड कल्पनांना
अंजारून गोंजारून चांदण्यांचे आरसेमहाल
पोकळ अलंकारांनी सजवले नटवले
त्या कवितेवर तिची फिर्याद आहे
जिने आयुष्याचे नागडे सत्य
उलगडून कधीच धरले नाही समोर
उलट त्यावरच पांघरली
जरतारी किनखापी वस्त्रे
स्वप्नांच्या मृदुमधुर काठावरची
त्या कवितेवर तिची फिर्याद आहे
जिने फसविले स्वतःचे स्वतःलाच
आणि जी मिरवत राहिली
भावकवितेच्या गोंडस पदराखाली
वर्षानुवर्षे अनेक कवींच्या लेखणीतून

## विमुक्ता

पिकलेल्या रसाळ फळासारखे
तिचे व्यक्तित्व पुरेसे पिकले आहे
स्वतःशी झगडता झगडता
ती स्वतःतून वाढत गेली
श्वास गुदमरलेल्या हजारो स्त्रियांचा
ती एक मुक्त श्वास झाली

अर्थाच्या छटांमधले धीट अर्थ
तिने कधीच वेशीवर टांगले
शब्दाच्या भाराखाली दडपलेल्यांसाठी
तिनेच प्रथम मुक्तीचे गीत गायले

तिच्या मागे कोणी आले नाही
तरी खाली वळलेल्या माना तिला शोधीत होत्या
तिच्या दूरवर गेलेल्या पावलावर
कल्पनेने आपली पावले उमटवत होत्या

ती आज त्यांच्यात नाही
पण तिची सावली सर्वदूर आहे
उसळता अग्निडोंब पेटला नाही
पण ठिणगी ठिणगी धुमसते आहे.

## गेट सेट

जगातल्या पहिल्या विवाहितेला
सप्तपदी चालताना
पुरोहितानं सांगितलं
ऑन युवर मार्क
गेट सेट
गो .........
ती अजूनही पळतेय.

## स्त्री

कोणाला काही दिलं
कोणी काही घेतलं
कोणी चुटपुटत्या स्पर्शासाठी
गर्दीतही चाटून गेलं

कोणाच्या नजरेनं
कधी फाडून खाल्लं
कोणी अधूनमधून
फोन करून समाधान मानलं

कोणी चर्चेच्या गोंडस नावाखाली
सहवासाची ऊब पीत राहिलं
कोणी नावालाच गोंजारून
कल्पनेनं चुंबून घेतलं

कोणी पानं, फुलं, कोणी फळं
वाटेवरच्या झाडाला नागवीत गेलं
झाडाला कधी कळलं नाही
काय मिळवलं काय विकलं.

## लोकलमधे

गर्दी अंगावरून जाते
ती तिचे स्त्रीपण विसरते
कधी धक्के खाते
कधी चार देते
लोकलमधे शिरताना
पाण्यासारखी रेटली जाते
उभ्या उभ्या पेंगते
पेंगता पेंगता स्वेटर विणते
कधी जागा मिळालीच बसायला
तर लोकलमधेच भाजी निवडते
नेहमीचेच चेहरे पाहून
नकळत ती हसतेही
गर्दी विसरून भोवतालची
कधी स्वतःशीच रडतेही
कधी स्टेशन येते
तिचे तिलाच कळत नाही
पायांना पक्के ठाऊक असते
कसे कोठे उतरायचे नाही
घड्याळ असते तिच्या मनात
क्षणोक्षणी किटकिटणारे
कधीच ती विसरलेली असते
एक मन होते तिलाही गाणारे

## दिन-विशेष

आजचा विशेष
ऑफिसमधून आल्यावर
लिंबाचे लोणचे घालणे
उद्याचा विशेष
कॉलेजमधून आल्यावर
कुर्डयाला गहू भिजवणे
परवाचा विशेष
दवाखाना बंद झाल्यावर
घरी येऊन सुरळीच्या वड्या
तेरवाचा विशेष
फॅक्टरीला सुट्टी मिळाली
तर पुरणपोळ्या
कालचा विशेष
नवरा आणि मुले घरी येईपर्यंत
पलंगावर डाराडुर झोप
किंवा
शेजारणीशी पोटभर गप्पा

## बलात्कार

कुणी फिरवतंय तिला गरगर
नजरेच्या जबर धाकावर
टिचभर हुंड्यासाठी कुणी
अग्नी ठेवलाय तिच्या पदरावर
कुणी कातरलेत तिचे पंख
शरीराच्या मोबदल्यात
कुणी कैचीत पकडलंय तिला
परंपरांच्या आडरानात
कुणी शोषलंय तिचं रक्त
आपली मिजास ठेवण्यासाठी
कुणी नख लावलंय तिच्या प्रेमभावनांना
उधळू नयेत म्हणून सहस्त्रकारंजी
कुणी कसे कुणी कसे
तिला तोडत मोडत गेले
स्वतःसाठी तिच्यापाशी
एक कलेवर उरले.

## बातम्या

घरगुती भांडणातून पत्नीचा खून
        विवाहितेचा छळ आरोपातून
        सबळ पुराव्याअभावी मुक्तता

जाचास कंटाळून विवाहितेची मुलासह आत्महत्या
        अंधश्रद्धेचा गैरफायदा घेऊन
        बुवाबाजी करणाऱ्यास अटक
        महिलांशी अनैतिक संबंध
        दीडशे महिलांना फसविले

विवाहित महिलेला जबरीने टेम्पोतून नेऊन विनयभंग
        महिलेचा पेटवून खून
        नवरा आणि सासूची
        पुराव्याअभावी मुक्तता

गर्भजल परीक्षेचा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग
        लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने
        पत्नीचा मृत्यु
        नवविवाहितेचा संशयास्पद मृत्यु

सकाळच्या चहाबरोबर या रोजच्या बातम्या
बिस्किटांइतक्याच चवीने लोक खातात
        पान उलटावे इतक्या सहजतेने
        निर्विकारपणे विसरूनही जातात

तिच्या धावपळीच्या रोजच्या क्रमात
बोचत राहतात कुठे कशा वेदना याही
सन लिहिताना ती कधी लिहिते १८८८
शतकाची चूक बदलावी असे तिला वाटत नाही.

## यादी

तांदूळ ५ किलो
गहू १० किलो
साखर १० किलो
गूळ २ किलो
भाव दिवसेंदिवस भडकताहेत
यादीत थोडी काटछाट करायला हवी
ह. डाळ ३ किलो
तूर डाळ २ किलो
वीजेचं बील भरायचंय
एल्. आय्. सी. चा चेक लिहायचाय
साबण वार २
जिरे १०० ग्रॅम
मोहरी $\frac{1}{4}$ किलो
किती वर्षानुवर्षं करायची तीच तीच यादी
कंटाळा १ किलो
वैताग २ किलो

## स्त्रीजन्म

सोहाळे स्त्रीत्वाचे
अंगाखांद्यावर मिरवले
त्याच्याच भांडवलावर
आयुष्याला भोगले
दुसऱ्याच्या नजरेनं
स्वतःचा देह निरखला
आरशाला रूपाचाच
सवाल विचारला
देहाचे समाधान
आयुष्याचे ध्येय झाले
रात्रीचे स्वप्न
दिवसाचे दिवाभीत ठरले.

## स्त्रीमुक्ती

इथे फॅशन शो होतात
मॉडेल्स अंगप्रत्यंगातून झगझगतात
सौंदर्य सम्राज्ञीचे मुकुट
सर्वांगसुंदर युवतींच्या शिरावर विराजतात

इथे टी.व्ही. वरच्या जाहिरातीतून
सौंदर्याबरोबर माल खपवितात
साऱ्या प्रसाधनांच्या प्रदर्शनातून
स्त्रीत्वसुद्धा विक्रीला ठेवतात

इथ चित्रपटातील नायिका
नवऱ्याच्या प्रेयसीला बहिण मानते
प्रेयसीचे एखादे मूलही
आपले मानून आनंदाने सांभाळते

इथे नाटकातला एखादा ड्रायव्हर
हंटर घेऊन बायकोला बडवतो
हाऊसफुल्ल लोकप्रिय कॉमेडीला
स्त्रीपुरूष प्रेक्षक उचलून धरतो

इथे कादंबरीतील जलाशयावर
षोडशा अनावृत्त पाणी भरते
पुस्तकासाठी वाचनालयात नंबर लागतात
तेवढीच कल्पनेत तृप्तीची ढेकर येते

इथे दरवर्षी दिवाळी अंक
मुखपृष्ठावरील स्त्रीच्या मापावर खपतात
कोणी काय लिहिले यापेक्षा
कथेच्या चित्रावरून गोष्टी वाचल्या जातात

इथे कधी एखादी स्त्रीमुक्तीवाली
चिडून लेख लिहिते, घसा फोडून भाषणे देते
तिच्या अभिनिवेशाला टाळ्या देणारे कोणी
'अरेरे विचारी बाई !' म्हणून तिची कीव करते.

## तू कोण ?

तू कोण बाई ?
मी इकडची जाई.
तू कोण बाई ?
मी दोन मुलांची आई.
तू कोण बाई ?
मी सासूसासऱ्यांची दाई.
तू कोण बाई ?
माझं मलाच ठाऊक नाही.

## ती एक मिनी कॉम्प्युटर

माझा गंजिफ्रॉक कुठाय ?
( साली एक गोष्ट घरात जाग्यावर मिळेल तर शपथ ! )
अहो, तारेवरच आहे
तुमच्या अगदी नाकासमोर
आई ग, माझी सायन्सची वही पाह्यलीस ?
जेवायच्या टेबलाखाली पडलीय बघ
सूनबाई आयोडेक्स कुठं सापडत नाहीये ते ?
भांड्याच्या शेल्फात दुसऱ्या कप्प्यात
डाव्या हाताकडून चौथ्या बरणीच्या शेजारी
( च्यायला ही काय औषधं ठेवायची जागा आहे ? )
आपल्या घरात पंचाग होतं ना ग ?
शेजाऱ्यांनी नेलंय. अजून दिलं नाही.
तेरसख्ख किती ग आई ?
( काय कार्टी आहे, घाईच्या वेळात नेमका तेराचा पाढा
विचारते. )
अगं पाढा येत नाही तर गुणाकार करून बघ
प्रत्येक वेळी मीच कशाला सांगायचं !
तुला पैसे दिले होते ना वाण्याचं बील द्यायला ?
उरलेले परत हवेत का ? पाच रुपये अठ्ठावन
पैसे आहेत.
दळणं दिलीस का ग ?
( ह्यांना काय होतं बसल्या बसल्या निवडायला
कोण जाणे ! )

अहो, आज गुरुवार, गिरणी बंद आहे.
सोळा वर्षांपूर्वी डोळ्यात स्वप्नं घेऊन
एक भावूक तरुणी इथं आली होती
ती कुठ राहते हो ?
ती ना ? हरवून गेली.

## कॅक्टस्

लग्न झाल्यावर पाहता पाहता
भाड्याच्या दोन खोल्यांतून
ती पाच रूम्सच्या आलिशान
फ्लॅटमध्ये रहायला आली

त्याने नोकरी सोडून
कॉन्ट्रॅक्टरचा धंदा सुरू केला
लौकरच तिच्या दाराशी
मारुतीचा पांढरा हत्ती झुलू लागला

इंग्रजी मराठीचे मिक्स्ड कॉकटेल
जोडीला ड्रिंक्स पार्टी आली
साहेबांचा ताल सांभाळता सांभाळता
आई होण्यापूर्वीच ती ममी झाली

बॉन्साय नर्सरी श्वानप्रदर्शनं
तिचे छंद वाढत गेले
आर्ट गॅलरी क्लब रोटरी
आयुष्याचे रस्ते उंचावत गेले

काश्मिरहून आणलेल्या वॉल टु वॉल गालिचासारखे
मखमली जीवन बर्थ टु डेथ पसरले
मनाला कधी काळी डसणारे प्रश्नांचे काटे
हॉलमधल्या कुंडीत शोभेचे कॅक्टस् झाले.

## रूपकंवर

बाई ग, तू एक कोडे आहेस
ज्या देवाच्या परलोकातील सुखासाठी
तू जळत्या यातनांतून पार होतेस
तुझ्या रसरसत्या तारुण्यावर
निखारे ठेवतेस अहेवपणी
त्याच देवाच्या आधी
तू प्राण ठेवले असतेस तर
तुला ठाऊक आहे
त्याने महिनाभरातच आणली असती
तुझीच कोणी सखी
धामधुमीने मिरवत अग्नीच्या साक्षीने
बाई ग, तू एक कोडे आहेस.

## विटंबना

जगाच्या जळजळत्या नजरेपेक्षा—
जिव्हारी झोंबणाऱ्या जहाल शब्दांपेक्षा—
अंधारात चाचून कुणी चोथा करण्यापेक्षा—
एकाकीपणाच्या आगीत होरपळण्यापेक्षा—
लाचार आयुष्याचे तुकडे मोडत बसण्यापेक्षा—
सहानुभूतीचे बुळबुळीत शब्द पांघरण्यापेक्षा—
हे रूपकंवर,
तुला मऊशार स्पर्शाचे वाटले काय
जळजळीत ज्वाळांचे अग्नीकुहार ?
की रोज थोडे थोडे जिवंत मरण्यापेक्षा
झोकून दिलेस एकदाच
बेधडक आयुष्याला अग्नीच्या खाईत ?
सतीची देवळे उभारणारांनो,
निदान एवढी तरी विटंबना करू नका
स्त्रीच्या माणुसपणाची !

## शंभर वर्षे

१८८७ : ऋतुमती होण्यापूर्वीच
अंगापेक्षा मोठा बोंगा सावरत
नाकात नथ गळ्यात ठुशी
कानात कुड्या दंडात वाकी
खाली मान नजर तिरकी
लाजत लाजत, अंगठ्यानं जमीन उकरत
इकडच्या स्वारीच्या चरणकमलांशी
ती जन्मजन्मीची दासी
नतमस्तक होऊन विरून गेली

१९८७ : घरची उत्तम आर्थिक स्थिती
पदवीचे चार ठसठशीत दागिने
पंजाबी ड्रेस, झिरझिरीत ओढणी खांद्यावर
मान ताठ तीक्ष्ण नजर
आवाजाचा स्वरही थोडा वर
कुठंही जायला हाताशी स्कुटर
नोकरीही कशी भरभक्कम
खांद्यावर हात दिवसरात
मित्रासारखी त्याची संगत सोबत

लग्नाचे बंधन गळ्यात पडल्यावर
एका सावध क्षणी कळून चुकले
पळता पळता शंभर मैल पळून झाले
तो मात्र आहे तिथेच आहे अजून तसाच.

## संध्याकाळ

घड्याळाचा काटा पाच वर येण्यापूर्वीच
ती रोजच ऑफिसमधून पळ काढते
बाई म्हणून ती हक्काने
एवढी तरी सूट मिळवते

पळत पळत येऊन
तिला बस गाठायची असते
ऑफिस सुटल्यावर होणारी गर्दी
तिला परवडणारी नसते

सहा वाजण्यापूर्वी धावत पळत
घराचे कुलूप उघडायचे असते
मुले नवरा येण्यापूर्वी
पदर खोचून गृहिणी व्हायचे असते

कधी कांदेपोहे, उपमा, शिरा
प्रत्येकाची एक मागणी असते
गरम गरम चहा आणि डिश
तिची भूमिका वेटरची असते

त्याच्यामागे स्कुटरवरून भरधाव
उडत जावे तिला वाटत असते
निदान सुखदुःखाच्या गप्पा करत
पाय मोकळे करावे तिला वाटत असते

विरळ होत चाललेल्या पांढऱ्या केसांवर हात फिरवत
तो टी. व्ही. पुढे मख्ख बसून राहतो
कधी डोळ्यापुढे पुस्तक धरून
निवांत संध्याकाळ भोगत राहतो

मुलेही झालेली असतात पसार
मैदानावर त्यांचे क्रिकेट रंगते
निमूटपणे संध्याकाळचे केर काढत
ती मुकाट स्वतःला कोंडून घेते

रात्रीचा स्वैपाक ? पुन्हा एक प्रश्नचिन्ह
तिच्या डोक्यात घोंघावू लागते
दहा वाजून गेलेले असतात
जेव्हा ती टेबलावर बोळा फिरवते

मुलांचा पहाटे क्लास, नवऱ्याचा डबा
लौकर लौकर उठायचे असते
शरीर दमून थकून पाठ टेकते
तरी किती वेळ ती टक्क जागी असते

## बायको

बायकोने नसते
    आजारी पडायचे
बायकोने नसते
    मित्रांशी बोलायचे
बायकोने नसते
    म्हातारे दिसायचे
बायकोने नसते
    नवऱ्यापेक्षा उंच व्हायचे
बायकोने असावे
    सदा ताजे टवटवीत
जाहिरातीतल्या बाईसारखे
    हसरे खेळते सदोदित
नोकरीवरून दमून आल्यावरही
    स्वैपाक करावा साग्रसंगीत
रात्रीही जागत बसावे
    त्याचे पाय हलके चुरीत
बायकोने असावे
    बायकोसारखे
ब्रेक ड्रायव्हरच्या हाती देऊन
    निमूट पळणाऱ्या स्कुटरसारखे

## प्रसिद्धी

आळीचे फुलपाखरू व्हावे
तसा तिचा कायापालट झाला
एक शेपटा गळून
त्या जागी बॉबकट आला

पाचवारी साडी जुनाट झाली
पंजाबी ड्रेस सुटसुटीत वाटला
ब्युटी पार्लरमधे पाच-पन्नास रुपयांत
एक नवा चेहरा विकत मिळाला

थोडी हौस थोडी कमावलेली भाषा
प्रसिद्धीचा झोत आपसूक चालून आला
त्यातच तिला उचलून धरणारा
एक 'गॉडफादर' साहित्यिक भेटला

तिचा एक कथासंग्रह
महिन्याभरात प्रसिद्ध झाला
तिची भाषणे ठरविण्यासाठी
कित्येकांचा क्यू लागला

रेडिओवर झाल्या मुलाखती
स्पेशल इश्यूमधे लेख आला
टी. व्ही.ने सुद्धा झटपट
तिचा प्रोग्रॅम ठरवून टाकला

व्याख्यानातून तिने नेहमी
स्त्रीमुक्तीचा विचार मांडला
तिचा गॉडफादर मनातल्या मनात
मिस्किल हसला.

## गतीची सर्कस

घड्याळाच्या दोन काट्यांवर दोन पाय
गतीची सर्कस ठाऊक आहे काय ?

उभ्या उभ्या चहा
हेडिंगपुरता पेपर पहा
तोवर वाजले सहा

ओतू गेले दूध कसची आता साय ?
गतीची सर्कस ठाऊक आहे काय ?

तीन मिनिटांत केरवारे
अंघोळ पटपट उरका सारे
आपले बाबा बॉबकटच बरे

वेणीफणीला वेळ आता उरलाच नाय
गतीची सर्कस ठाऊक आहे काय ?

पाच मिनिटांत पंधरा फुलके
घाईच्या वेळी भाजीला दोडके (नेमके !)
भाताविना जेवण हलके
नेमका मेला गॅस संपून जाय
गतीची सर्कस ठाऊक आहे काय ?

घर ते स्टेशन मैल चार
सात मिनिटांत होते पार
सकाळच्या अध्यायाचे हेच सार
साडेनऊच्या ठोक्याला क्ष्हिटीवरती उतरली बाय
गतीची सर्कस ठाऊक आहे काय ?

## बिनचेहऱ्याची

ह्या समुद्राएवढ्या शहरात
सगळीकडे माणसं माणसं माणसं
चालणारी खाणारी पळणारी झोपणारी
त्यात एक ती ही
कोणाची तरी बायको
कोणाची तरी मुलगी
कोणाची तरी आई
प्रत्येकाची कोणी ना कोणी
तिला एक नाव आहे
तिला एक घर आहे
आभाळाएवढे प्रश्न आहेत
ती शोधते आहे एक चेहरा
तिची तिला ओळख पटवून देणारा

## दोन मुलांची आई

दोघांनी आयुष्यभर
कर्जाचे हप्ते फेडले
आणि आयुष्याच्या शेवटी
दोन टीचभर खोल्यांचे
एक घर स्वतःचे झाले

घराची स्वप्ने पाहता पाहता
घर हाती येण्यापूर्वीच
त्याने राम म्हटले
स्वतःच्या सोबतीला
स्वतःलाच घेऊन
तिने नवे घर
नव्या जोमाने लावले

तशी तिला दोन मुले आहेत
दोघेही भाग्यवान आहेत
दोघांना ऑफिसची घरे आहेत
स्वतःची बायकोमुले आहेत
श्रीमंत सासूसासरे आहेत
प्रायःहसीची कल्पना आहे
आपल्याला एक आई आहे
याची (कधीमधी) आठवण आहे
अधूनमधून तिला साडी घेऊन
आपले कर्तव्य त्यांनी पार पाडले आहे

अठरा लाखांचे एक शहर
त्यामधे ती आणि तिचे घर
सोबतीला एका टी. व्ही.ची भर
सारे आयुष्यच संधीवात झाल्यासारखे
मुडपून आलेले अंगावर
एकटेपणाचा एक कॅन्सर
व्यापून उरलेला तिच्या तनमनावर.

## गृहिणी

तिचा मूड असो नसो
सारे तिला गृहीत धरतात
लहान थोर सर्वच जण
तिला उपभोगून घेतात

तिचा मूड असो नसो
सर्वांना हवी असते ती प्रसन्न
तीच बसली उदास होऊन
तर सारे घरच होते खिन्न

तिचा मूड असो नसो
भोज्याच्या खांबासारखी ती असते मध्यावर
असते ती हक्काची सर्वांच्या
पण तिचा हक्क नसतो कुणावर

## छोट्या जाहिराती

### विवाहविषयक

वधू पाहिजे — उंची ५ फूट ३॥ इंच
वय २१॥ वर्षे
स्वच्छ गोरी, कोवळी
देखणी, सडपातळ बांध्याची
उच्च पदवीधर, नोकरी करणारी
( सर्व पैसे नवऱ्याकडे देणारी )
स्वभावाने गरीब सालस
( सासूच्या मुठीत राहणारी )
उच्च वर्णीय, सधन घराण्यातील
( भरपूर हुंडा व मानपान देणारी )
कामसू आणि विनयशील
एकत्र कुटुंबात सामावून घेणारी
( स्त्रीमुक्तीचे वारे डोक्यात न शिरलेली )
चोखंदळ निवडीसाठी जाहिरात

वर पाहिजे — कोणतीही अट नाही
( फक्त पुरुष हवा ) प्रौढ, प्रथमवर
सापत्य विधुर, कोणीही चालेल

## बॉन्साय

केसांना काळा डाय लावून
तिने आपले तरुणपण रोखून धरले
ओठांना लाल लिपस्टिक लावून
सुकलेले गुलाब ताजे केले
भुवया नीट कोरून काढून
मदनबाण सज्ज ठेवले
ब्युटी पार्लरमधे फेशल करून
टीन एजरचे मुखवटे घातले
रेशमी वस्त्रे अंगावर लपेटून
गरम रक्त सळसळत ठेवले
वयाची उंची कापता कापता
आयुष्याचेच बॉन्साय झाले

## त्यानंतर

वाटले होते तितके
सोपे नव्हते एकटीने राहणे
सगळे आधार सोडून
आपले आपणच जगणे

घर सोडल्यावर कळले
घराचे छप्पर भक्कम होते
त्याचे हात सोडल्यावर कळले
हातावर एक मन होते

सल्ला देणारे आधारकेंद्र
आता निराधार करून गेले
मुक्त झाल्यावर साऱ्यापासून
मुक्तीचेच पिंजरे झाले

प्रेमाचा अर्थ निरर्थ ठरला
तरी एक प्रेम मनात जागे आहे
घराची वाट दूर दूर सरली
तरी एक घर मनात ताजे आहे

स्त्रीत्वाची सारी बंधने
तोडून मोडून फेकून दिली
हा जन्मच असा खडतर
शरीराची जाणीव कधीच नाही विरली

## सुट्टीचा दिवस

रविवारचा दिवस
न्हाण्याचा धुण्याचा
इडली चटणी करण्याचा
कपड्यावर इस्त्री मारण्याचा

रविवारचा दिवस
साग्र संगीत स्वैपाकाचा
दुपारी दळणे काढण्याचा
संध्याकाळी मंडई करण्याचा
आठवड्याची भाजी भरण्याचा

रविवारचा दिवस
सहा दिवस मोजीत रहायचा
घरकामानं दमदम दमायचा
सुट्टी म्हणून स्वतःलाच विकायचा

## फ्लॅटमधे

स्वतःचा फ्लॅट घेण्यासाठी
तिने दोघांचे आयुष्यभराचे पगार पणाला लावले
सिमेंटच्या जंगलातील एका काड्यापेटी कोपऱ्यात
आयुष्य सार्थकी लागल्याचे समाधान झाले

फ्लॅटमध्ये असावीच लागते
एक बेडरूम आणि त्यात एक डबलबेड
तुमच्या टीचभर गॅलरीलाही हवे
तरंगत्या कुंड्यांतील कॅक्टस्चे वेड

दहाबाय दहाच्या किचनमधे
लांबरुंद ओटा हवा
पितळस्टील जुने झाले
फ्राईंग पॅनचा सेट नवा

टीव्ही सोफ्याशिवाय होतच नाही
हॉलचे डेकोरेशन पुरे
अधूनमधून फुलदाणीत हवेतच
लांब दांड्याच्या निशिगंधाचे तुरे

फ्रिजमधे हवीतच थोडीफार फळे
सरबताच्या बाटल्या आईस्क्रिमचे कोन
भिंतीवर (निदान भाड्याने आणलेले) एक दोन मोठे सीन
प्रतिष्ठेसाठी तरी टीपॉयवर फोन

फ्लॅटमधे राहिल्यावर
घालावाच लागतो नाईट गाऊन
चेहऱ्यावरही फिरवावा लागतो हात
ब्युटी पार्लरमधे कधीमधी जाऊन

फ्लॅटमधे राहिल्यावर हे सारे
आपोआप जमत जाते
कर्जाचे हप्ते फेडण्यासाठी
नवीन कर्ज काढण्याची सोय असते

मात्र फ्लॅटचे दार नेहमी बंद असावे
आपले वेगळेपण डबाबंद जपावे
दिसलेच कोणी शेजारीपाजारी
तर घडीदार काटेकोर हसावे.

## धुंदी

तिचे बाईपण तिला चढले आहे
पेल्यातून दुथडी वाहणाऱ्या मद्यासारखे
त्यागाचे डोंगर चढण्यात
तिला वाटतो स्वत्वाचा अभिमान
अपमानाची दगडी जखम
तिला वाटते स्त्रीत्वाची निशाणी
त्याच्या सुखासाठी स्वतःचा बळी जाताना
तिला वाटतो आपला गौरव
थकलेला देह त्याने कुरवाळताना
वाटते तिला बाईपणाची इतीश्री
घरपण टिकविण्यासाठी झिजझिज झिजण्यात
वाटते तिला आयुष्याचे सार्थक
मनावरची ही धुंदी कधी उतरलीच तर,
दिसेल तिला तिचे ही पाय मातीचे होते

## तळयात मळयात

हलक्या हाताने ती इंजेक्शन देते
पेशंटच्या पोटावरचे टाके कसबाने शिवते
स्वतःच्या लग्नात रुखवतावर मांडण्यासाठी
वेळात वेळ काढून वेलबुट्टीचा कशिदा विणते

एम्. एस्सी. झाल्यावर विज्ञान शाखेत
तिने तीन वर्षांत पी.एच्. डी. केली
मूल होण्यासाठी वाट पाहता पाहता
कोण काय सांगेल ते नवस बोलली

बुद्धिमत्ता कसोटीला लावून
तिने आपले लेक्चर चांगलेच गाजवले
वर्गात शिरता शिरता कपाळावरची टिकली पडली
म्हणून तासभर तिचे मन चुकचुकत राहिले

## नको बाई

तू अशी ओतू जाईस्तो हसू नकोस
डोळे मोडत पारदर्शी बोलू नकोस
नको दिसूस फार लोभसवाणी
जाता येता नकोस गुणगुणू सिनेमातली गाणी

नको बाई घालूस कपडे लक्ष वेधणारे
हातवारे नको करूस मन मोहणारे
नको येऊस रात्री उशीरा घरी
उभी राहू नकोस सांजवेळी दारी

या नको नकोची मुरड
नकोशी वाटली तरी घाल आयुष्याला
बंधनापलिकडचे मुक्त जग
स्वप्नातच केवळ असते सोबतीला

## अवलंबिता

चार पाहुणे यायचेत बाई
यायचेत जेवायला
आता कसं करू बाई
मिक्सर बिघडला
स्वैपाकाची बाई
नेमकी नाही आली
पाव आणिन म्हटलं
तर बेकरी बंद झाली
दूध तापवायला गेले
तर गॅस संपून गेला
आता कसं करू बाई
मिक्सर बिघडला
आईस्क्रिम करू गेले
तर लाईट नेमके गेले
केक तरी भाजीन म्हटले
ओव्हन न चाले
नुसती चिरीन फळं म्हटलं
तर स्लाईसर कुठं गेला
आता कसं करू बाई
मिक्सर बिघडला
जाऊ म्हटलं घेऊन झालं
सगळ्यांना हॉटेलला

एका जेवणापायी
दोनशेचा खुर्दा झाला
पैसे फार गेले
तरी शीण नाही आला
बाहेरच्या बाहेर बाई
पाहुणा कटून गेला

## आक्रस

छोटे कुटुंब सुखी कुटुंब
या चौकटीत ते मावत नाहीत
दोन खोल्यांच्या चाळीतल्या घरात
सासूसासरे रमत नाहीत

त्यांचे एक हातपाय पसरलेले
लंबेचौडे घर आहे गावाकडे
कौलारू छप्पर मातीच्या भिंती
वृन्दावन उभे अंगणात वेडेवाकडे

विकून टाकले तर मिळेलही
एखादा छोटा फ्लॅट शहरात कुठेतरी
पण सासूसासरे मग कायमचेच
हक्काने पसरतील तिथच पथारी

आता आपले बरे आहे
येतात अडीनडी बाळंतपणाला
भांड्याला भांडी वाजू लागली
की निमूट जातात परत गावाला

म्हटले तर आहे म्हटले तर नाही
असे असावे आजकाल नाते
ज्याचे त्याचे आभाळ असते
आपापल्या डोक्यापुरते,

## प्रतिबिंब

तो आरशात पाहतो तेव्हा
त्याला दिसतो
जसा तो असतो

ती आरशात पाहते तेव्हा
तिला दिसते
जशी ती नसते.

## आधार

लग्नापूर्वी शिकून सवरून
        नोकरी धरलीस
लहान भावंडांचे शिक्षण करत
        आई-बापांची सेवा केलीस
साऱ्या घराचा आधार झालीस
        तडफेनं उभी राहिलीस

विवाहानंतर देखील
        नाही बसलीस स्वस्थ
नोकरी अन् संसाराच्या दोन स्कुटर्स
        एकाच वेळी चालविल्यास समर्थ
खांद्यावरती पेललास अर्थभार
        जीवन केलेस तुझे सार्थ

वृद्धपणासाठी देखील
        करून ठेवलीस पैशाची तरतूद
मुलांच्याच वाहिल्यास काळज्या चिंता
        त्यांनाच दिलास पैशाचा आधार
वृद्धाश्रमात राहिलीस एकाकी
        मुलांवर झाली नाहीस कधीच भार

कौमार्यात सांभाळी पिता
विवाहानंतर पती
वृद्धपणी आधार मुलाचा
हेच तुझे स्वातंत्र्य सती
मनुस्मृतीतील कोरीव वचने
सांगा आम्ही पुसणार कधी
कोण आहे आधार कुणाचा
डोळे उघडून पाहणार कधी

## स्वस्त

कादंबरीतील स्त्री सुंदर असते
तिच्या कृपाकटाक्षावर त्याचे भवितव्य ठरते

कवितेतली स्त्री नाजुक साजुक शब्दाने घडते
फुलांचेच तन तिला फुलांचेच मन असते

सिनेमातल्या नायिकेसाठी प्राणाची बाजी लागते
चार दोन खून पडतात जेव्हा तिची प्राप्ती होते

प्रत्यक्षातली स्त्री फार फार स्वस्त असते
हुंडाबळी घेणाऱ्याला दुसऱ्या लग्नाची काळजी नसते

## वाटणी

तीन मुलांची तीन घरे
प्रत्येकाला वाटे
तिने दुसऱ्याकडे रहावे
मोठा म्हणे मधला
आहे पैसेवाला
आई काही कधी
जड नाही त्याला
मधल्याला वाटे
मी काय मक्ता घेतला
आई असावी तीन तीन महिने
प्रत्येकाच्या वाट्याला
धाकट्याची बायको
सासूशी जमवून घेत नाय
माझी आपली गरीब गाय
हा माझा दोष काय ?
धाकट्याला वाटे
माझे घर माडीवर
दमेकरी आईला
कसे चढता येईल जिन्यावर
ती म्हणे मी तीन मुलांची आई
मोठी भाग्याची बाई
नाही मिळाला जमीनजुमला

पण प्रत्येकाला शिकवला
आपल्या पायावर उभा केला
आवडत्या मुलीबरोबर
संसार थाटून दिला
सगळेच मला म्हणतात
आता आमच्याकडेच ये रहायला
प्रेम त्यांचे इतके तरी
का ग पाणी तिच्या डोळ्याला ?

V. IMP.

## काल आणि आज

ती जन्मण्यापूर्वीच
सतीची चाल बंद झाली
केशवपनाची पद्धत कायद्याने संपली
विधवा विवाहाला चालना मिळाली
एकत्र कुटुंबपद्धती संपुष्टात आली
नवरेशाहीची मूठ थोडी सैल झाली
स्त्रीशिक्षणाला सुरुवात झाली
स्त्रीची नोकरी गृहीत धरली गेली
महाराष्ट्राचा इतिहास वाचता वाचता
स्वतःच्या उशीराच्या जन्मामुळे ती थोडी सुखावली
ती मोठी होता होता
स्त्रीच्या जबाबदाऱ्या वाढल्या
आतबाहेरची सगळीच कामे गळ्यात आली
शिक्षणाने जसे स्वातंत्र्य दिले
तशी हक्कांची जाणीव दिली
हक्कांसाठी भांडता भांडता
जवळची नाती दुरावत गेली
पैसा हाती आला पण
सुखाची वाटी रिकामीच राहिली
अस्वस्थ मनाची निराधार स्त्री
श्रद्धेच्या टोकावर लोंबकळत राहिली
आपलेच वर्तमान वाचता वाचता
आजचीच दुःखे जडभार झाली

## गद्यमय

ती गाणे विसरली आहे
तिला फक्त पाढे येतात
ती ताल विसरली आहे
तिला फक्त तोलच समजतात
ती भाव विसरली आहे
तिला फक्त शब्द समजतात
ती काव्य विसरली आहे
तिला फक्त हिशोब येतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

## शेम ऑन हर

आज परिसंवादात तिचे
पेपर रीडिंग आहे
आठवणीने तिने
स्लीव्हलेस ब्लाऊज घातला आहे

रजा संपल्या आहेत
थोडे लौकर घरी जायचे आहे
केबिनमधे साहेबाची परवानगी घेताना
तिचा पदर किंचित् घसरला आहे } Think.

त्याने तिचे पेपर तपासले
यादी करून गठ्ठे बांधले
गोड हसून 'थॅन्क्यू' म्हणत
तिने 'शेक हँड'चे बक्षीस दिले. ← ?!!

TENSION.

## बायकी

तो आज उशीरा आला
म्हणून ती चिडली
तो आज लौकर आला
म्हणून ती रडली
त्याला ती फारच हवी
म्हणून ती तक्रार करते
त्याला ती फारशी नको
म्हणून ती कुरकुर करते
तो भारी साड्या आणतो
तेव्हा तो उधळ्या ठरतो
तो साड्या वगैरे आणण्याच्या भानगडीत पडत नाही
तेव्हा तो बेपर्वा ठरतो.
या छोट्या मोठ्या दुःखांना
गोंजारण्याचा स्वभाव बनतो
या हळव्या चिंतांना कुरवाळण्यात
कित्येक बायकांचा जन्म जातो.

## दिल्या घरी तू

जाऊ नको भाबडेपणाने
उगाच भारून जाऊन
नवऱ्यासकट सर्वांनाच
डोळे उघडून घे पारखून

प्रेमाच्या नावाखाली
देऊ नकोस स्वत्वाला तिलांजली
पहिल्यापासूनच मुखवट्याविना
ओळख करून दे आपली

'प्रेम द्यावे प्रेमळाला
त्याग ही त्याची कसोटी'
हे वचन नाही एकटीचे
ते आहे दोघांसाठी

मुळूमुळू रडू नकोस
कोणी काही बोलले तर
तुझी जागा दाखवून दे
प्रत्येकाला वेळेवर

तू शिक्षणाने समर्थ उभी
स्वतःच्या पायावर
नाचू नकोस कधी कोणाच्या
डोळ्यांच्या इशाऱ्यावर

एक कोपरा राखून ठेव
स्वतःचा स्वतःसाठी
बऱ्या होत नसतात कधीच
वेदनेच्या जन्मगाठी

सासरी जाताना साडी ब्लाऊजबरोबर
दिले आहे एक घट्टमुट्ट मन
तेच आहे तुझे हत्यार
संघर्षाच्या काठावर

सांग स्वतःलाच बजावून
मंजुश्री होऊन मरायचे नाही
तोंड दाबून बुक्क्यांचा मार
मुकाट सोसत जगायचे नाही

रहा रोवून आपले पाय
निसटत्या वाळूवरही घट्ट रोवून
तू सुद्धा आहेस पुरुषाइतकीच महत्त्वाची स्त्री
हे एकदा साऱ्या जगाला दे सिद्ध करून.

Then Why Mercy, Guard, Protect

## देणे

पहाटेपासून चाके लावून फिरणारे पाय
दिवसभराच्या वणवणीनं थकलेलं शरीर
आणि निरसलेलं मन
असंख्य प्रश्नांचे असंख्य ताणतणाव
डोक्यात उभे आडवे वेडेवाकडे

दिवसभर भेटलेली किती प्रकारची माणसे
त्यांच्या बोलण्याचालण्यासहित
पुन्हा रात्री मनभर घुमणारी
टी. व्ही. वरचे कार्यक्रम
जांभयांसोबत मध्यरात्रीपर्यंत रेंगाळणारे

अंथरुणात अजूनही जागी आहेत
मुले हसत खिद्ळत
डोक्यावर घुमणारा पंखा
आणि घामाच्या धारा
त्यालाही दाद न देत वाहणाऱ्या

डोळे मिट्ट मिट्ट झालेले
वाट पाहणारे थंड काळोखाची
देणे दिल्यासारखे ती देते शरीरही
रोजच्या कामाचा एक भाग म्हणून
तेव्हाही तिच्या मनात धावत असते

सात सत्तावन्नची फास्ट लोकल
गर्दीत पळणारे पाय
अर्धवट निवडलेली भाजी
संपत आलेला गॅस
आणि इतर बरेच काही ......

## सुखी संसार

त्याच्या कल्पनेइतकीच
तिची झेप हवी
त्याच्या जाणिवेइतकीच
तिची संवेदना हवी
त्याच्या सुखाच्या मोजमापाइतकाच
तिचा शृंगार हवा
त्याच्या डोळ्याच्या धाकाइतकाच
तिचा रस्ता लांब हवा
त्याच्या हाकेच्या अंतरावर
तिची सावली हवी
त्याच्या विचारांचीच छाप
तिच्या बोलण्यावर हवी
संसारसुखाचा हा वसा
तोंड मिटून सप्तपदीत घ्यावा
आपला एक खरा चेहरा
मोडून तोडून फेकून द्यावा.

## यंत्र

विकणे आहे
एक उत्साही कामसू देखणे
जिवंत तरूण यंत्र
स्वैपाक करते
कपडे धुते
नोकरी करून
पैसा मिळवित
पाहुण्यांची सरबराई करते
घरसुद्धा झकपक ठेवते
आल्या आल्या हसून स्वागत करते
चहा पोह्याच्या डिशेस तयार ठेवते
शरीराची गरज भागवते
वंशाला दिवा देते
कधी बिघडलेच तर बडबड करत
चार दोन थपडांत जागेवर येते
खर्चसुद्धा फार नाही
रोजच्या जेवणात भागून जाई
पन्नास हजारासहित सालंकृत घरपोच
त्वरा करा
आपली ऑर्डर आजच नोंदवा

## वाढत्या वयात

वय वाढत जाते
तेव्हा लक्षात येते
आपण नसलो तरी
घर आनंदात चालते

वय वाढत जाते
तेव्हा कळून चुकते
आपण सोडून प्रत्येकाला
स्वतःचे वेगळे जग असते

वय वाढत जाते
मन रिते रिते होते
कणाकणाने वेचलेले सारे
कवडीमोलाचे वाटू लागते

वय वाढत जाते
तेव्हा तुटत तोडत जावे
आयुष्यभर जोडलेले
मोडत मोडत जावे

## सुशिक्षिता

सोने म्हणजे विनव्याजी पैशाची
निरर्थक गुंतवणूक
यावर चांगले व्याख्यान देता येते
पण दागिन्यांचा मोह सुटत नाही

घर म्हणजे चार भिंती नाहीत
चार व्यक्तींच्या विश्वासाचा बंध
यावर चांगली कथा लिहता येते
पण सुसज्ज फ्लॅटचा मोह सुटत नाही

वस्त्रावरून माणसाची किंमत नाही
वस्त्रे असतात आरसे अंतरंगाचे
हे तत्त्वज्ञान पाठ करता येते
पण भारी साड्यांचा मोह सुटत नाही

अपघात उभे असतात फुटाफुटावर
कोणत्याही क्षणी संपणार असते सारे काही
ही निरर्थता क्षणाक्षणाला जाणवते
पण स्वामित्वाचा लोभ काही सुटत नाही

## स्टॅन्डर्ड

तिच्या कोरीव लांबसडक नखांचे रहस्य
आठ पंधरा दिवसांनी रुपये दोनशे फक्त
तिच्या धनुष्याकृती भुवयांचे आव्हान
दर आठवड्याला पाच रुपयांत स्वस्त

तिच्या गालावरच्या गुलाबांची जादू
ही तर क्रीम बेस रूजची किमया
हेअर सेट डाय शांपूविना
साऱ्या मेकपची रंगत वाया

नायलॉनच्या ब्रा आणि मॅचिंग पेटीकोटस्
शंभर सव्वाशेला तर पडतात
दीडदोनशेच तर आहेत साड्या
पुरवून पुरवून वापराव्या लागतात

महिन्याचे हजारभर स्वतःसाठी
म्हणजे काही फार नाही
देशाचे दर डोई उत्पन्न साठ पैसे
असला कसला हा भिकार देश बाई

## चार क्षण

चार क्षण बैस जरा
        लोकल गाठायची आहे
मोकळा श्वास घे जरा
        मुलांचा अभ्यास घ्यायचा आहे
हे पुस्तक वाचलंस ?
        डोळे त्याआधीच पेंगुळले आहेत
ती बातमी ऐकलीस ?
        कान बधीर केले आहेत
आसपास आंबा मोहरतोय
        वाढलेल्या किंमतीनं जीव धास्तावतोय
रात्र पौर्णिमेची आहे
        घड्याळाचा काटा उरात खुपतोय.

## विक्री वस्तू

तिला विसावे वर्ष लागले
दाखविण्याचे कार्यक्रम सुरू झाले
बाजारातली चलनी नाणी
त्यांनी आधीच हेरून ठेवली
बी.ए.ची एक स्वस्त शेपटी
नावामागे चिकटवून टाकली
गोरेपणाचे क्रीम लावून
रंग पुष्कळ उजळ केला
कुंडलीतले ग्रह सोयिस्कर फिरवून
लग्नाचा मार्ग सुकर केला
विनयशील प्रेमळ घरंदाज
विशेषणांनी नटवले सजवले
असल्या नसल्या साऱ्या गुणांचे
पाहुण्यांसमोर कौतुक झाले
चार-पाच वर्षे खपून खपून
तिला एकदाची हळद लागली
डोक्यावरचे ओझे खांद्यावर आले
कु मधून ती सौच्या घरी आली
दिवसरात्र काळजी करत
सारा खटाटोप जन्मापासून केला
पन्नास साठ हजाराचा ऐवज
एक दिवसात उडून गेला

## अशी ती

थोडी इथे थोडी तिथे
थोडी इकडे थोडी तिकडे
दहा पावले सरळ आणि
एक पाऊल वाकडे

थोडे आत थोडे बाहेर
थोडे जनात थोडे कानात
सारे काही दिले तरी
हातचे ठेवले मनात

थोडे तुझ्यासाठी थोडे त्याच्यासाठी
थोडे कुणासाठी थोडे कशासाठी
झिजला सारा देह तरी
उरले मन एका गाण्यासाठी

## एकदा तरी

एकदा तरी तिला जगायचे आहे
मोकळ्या श्वासाने माणूस म्हणून
पुरुषांच्या गर्दीत ( किंवा निर्पुरुष रस्त्यावर ) भटकायचे आहे
स्पर्शाचे अर्थ विसरून जाऊन

एकदा तरी तिला ठरवायचे आहे
तिचे तिने काय करायचे
बुडायचे की तरायचे
हसत रडायचे की रडत हसायचे

एकदा तरी तिला वाटते
खांद्यावर मान टाकून त्याने आधाराला यावे
तिच्याही कर्तृत्वाचे पोवाडे
पुरुषी अस्मिता विसरून त्याने गावे

एकदा तरी तिला वाटते तिच्या चेहऱ्याने
ठरवू नये तिच बरेवाईट भविष्य
तिच्या गोऱ्या गोमट्या कातडीवर
तोलले जाऊ नये तिचे आयुष्य

## गरजा

साड्यांचे एक अख्खे कपाट
त्यात शालू पैठणीपासून
स्टार्चच्या हलक्या कॉटनपर्यंत
सर्व पेठा नव्या जुन्या
घडीत मंद सुगंध लपेटून
तिच्यासाठी सदैव सज्ज

कपाटाच्या दाराला टांगलीयेत
पाच सात मंगळसूत्रं
मॅचिंगप्रमाणे ऑकेजनला साजेशी
कधी सर्वांचाच कंटाळा
तिचा गळा रिता !

ड्रेसिंग टेबलाच्या आरशाशी
स्वतःचा चेहरा न्याहाळणाऱ्या
सुंदर सुंदर रंगीबेरंगी बाटल्या
शाम्पू फाउण्डेशन नेलपेन्टस्
लिपस्टिकस् पावडर्स आयब्रोज
तिच्या मोहकपणाच्या साऱ्या छटा
त्यांच्यावरच अवलंबून !

दाराशीच आहे एक मोठे शेल्फ
चपला सॅन्डल्स्चे जणू दुकान
कोणी लाल कोणी काळ्या

कोणी उंच कोणी बुटक्या
कोणी वेलवेटी मऊ
कोणी हार्ड लेदरवाल्या
ज्या जास्त भाग्यवान्
त्या कारपर्यंत चालून दमल्या.

## वहिवाट

ती जन्माला आली
योगायोगाने स्त्री झाली
इतर मुली शाळेत जातात
ती शाळेत गेली
मुली वयात येतात
ती वयात आली
पन्नास टक्के मार्कवाल्या आर्टस्‌ला जातात
ती आर्टस्‌ला गेली
बी. ए. होईतो शिकत राहतात
ती शिकत राहिली
आईबापांनी ठरविलेल्या मुलांशी त्यांचे लग्न होते
तिचेही झाले
नव्या घराशी त्या मुकाट एकरूप होतात
तीही झाली
दोन चार वर्षांत दोन मुले होतात
तिलाही झाली
मुलांच करता करता त्या संसारात गुरफटतात
तीही गुरफटली
नाकासमोर सरळ संसार होत राहतो
तिचाही होत गेला
मुले मोठी होतात त्यांची लग्ने होतात
तिच्याही मुलांची झाली.

सासू झाल्यावर थोडे सासूपण गाजवतात
        तिनेही गाजवले
आजी झाल्यावर त्यांचे नातवंडांशी एकदम जमते
        तिचेही जमले
मग त्या म्हाताऱ्या होत मरतात
        तीही मेली
बहुतेक जणी याच रस्त्यावरून जातात
        तीही गेली

## ओळख

आहे न मी जुनी
वा नाही तशी नवी
ना परी आधुनिक मी
ना मी सनातनी

मागे कधीच नव्हते
वा नाही कधीच पुढती
हातात हात घेऊनी
चालले मी संगती

ना तशी स्वतंत्र मी
परी ना परतंत्र ही
बंधने वा मुक्ततेला
लेखी माझ्या अर्थ नाही

ना विसरले मी स्वतःला
शरणागत वा झाले नाही
माझी पटता ओळख मजला
मित्र झाल्या दिशा दाही

## स्वतःसाठी

कशासाठी कोणासाठी
सूर न जमलेल्या माणसांसाठी
कशासाठी कोणासाठी
न पटलेले शब्द झेलण्यासाठी
कशासाठी कोणासाठी
चेहऱ्यावरची सनातन सोंगे सांभाळण्यासाठी
कशासाठी कोणासाठी
स्वतःचे माणूसपण घडीघडी विसरण्यासाठी
कशासाठी कोणासाठी
कशासाठी कोणासाठी
एक क्षण झुगारून सारे
स्वतःसाठी जगण्यासाठी
स्वतःसाठी जगण्यासाठी

## निर्लेप

असून सुद्धा साऱ्यात
नसावे कशातच
असू नये आपले काही
होऊ नये कुणाचे काही
निर्लेप तव्यासारखे संसारात रहावे
सरणावरती काही न उरावे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २५७३
२५५९८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0025598
REFBK-0025598